**<u>प्रेस नोट दिनांक ०५/०६/२०१९</u>**

## दुर्मीळ जातीचे खवले मांजर विक्रीसाठी कोल्हापूर वरून आलेले दोन आरोपी युनिट १, गुन्हे शाखेच्या जाळयात

आज रोजी युनिट १ कडील अधिकारी व कर्मचारी ईद सना निमीत्त युनिट १ चे हद्दीत ईद निमीत्त पेट्रोलींग करत असतांना पो.ना. सचिन जाधव, यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की "दोन इसम एक खवले मांजर पोत्यामध्ये घेवून विक्री करण्या करिता कात्रज चौकात येणार आहे. सदरची बातमी वरीष्ठांना कळवून त्यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे युनिट १ कडील अधिकारी व कर्मचारी खाजगी वाहनाने कात्रज चौकात गेले. सदर ठिकाणी बातमी प्रमाणे खात्री करता कात्रज कोंढवा रोडवर बसस्टॉप मागे वरील बातमीचे आशया प्रमाणे दोन इसम आढळून आले.

त्यांना आहे त्या स्थितीत जागेवरच स्टाफच्या मदतीने ताब्यात घेवून त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव पत्ता १) रामचंद्र दिनकर गायकवाड, वय २९ वर्षे, रा. मु.पो. खडेखोळ, ता - पन्हाळा, जि.कोल्हापूर व २) सुरज धनाजी फाळके, वय २० वर्षे, रा. मु.पो. सातारा रोड, ता.कोरेगांव जि. सातारा असे असल्याचे सांगितले. त्यांचेकडे असलेल्या पात्याची पंचामसक्ष झडती घेतली असता त्यामध्ये एक चॉकलेटी मातेट रंगाचे खवले मांजर कि.रु. ५० लाख असे मिळून आले. सदरचे खवले मांजर हे ते दोघे विक्री करण्यासाठी घेवून आले होते.

सदरची कारवाई ही श्री.अशोक मोराळे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.मितेश घट्टे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे (अति.कार्यभार), श्री.समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अरुण वायकर, पो.उप.निरी. दिनेश पाटील, पो.उप.निरी. उत्तम बुदगुडे, पो.ना. सचिन जाधव, गजानन सोनुने, तुषार माळवदकर, पो.हवा. रिजवान जिनेडी, स.पो.फौज. बाबा चव्हाण, सुभाष पिंगळे, विजेसिंग वसावे, पो.हवा. अनिल घाडगे, अजय थोरात, प्रकाश लोखंडे, योगेश जगताप, बशीर सय्यद, श्रीकांत वाघवले, वैभव स्वामी, सुधाकर माने, तुषार खडके, उमेश काटे, यांनी केली आहे.